

# ऑनलाईन परीक्षेला सामोरे जातांना



## परीक्षेची पूर्वतयारी कशी करावयाची ?

- विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रम निहाय Mock Test विद्यापीठाच्या https://nmu.unionline.in या लिंकवर देण्यात आल्या आहेत त्या Mock Test देणे बंधनकारक आहे.
- संकेतस्थळावर Model Questions देण्यात आले आहेत ते नजरेखालून घाला.
- संकेतस्थळावर दिलेले अद्ययावत वेळापत्रक पहा व आपल्या परीक्षा कधी आहेत ते तारीखवार लक्षात ठेवा.
- वेळोवेळी विद्यापीठाच्या संकेतस्थळाला भेट देत राहा. ज्यामुळे वेळापत्रकात काही बदल झाले असल्यास लक्षात येतील.
- वेळापत्रक व हॉलतिकीटची प्रिंट काढून सोबत ठेवा.
- सर्व IT Coordinator ची यादी संकेतस्थळावर देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी ती यादी पाहून आपल्या महाविद्यालयाच्या IT Coordinator चा संपर्क क्रमांक परीक्षेपूर्वीच सोबत बाळगावा.

## ऑनलाईन परीक्षेसाठी आवश्यक साधनसामुग्री काय असावी?

- डेस्कटॉप, लॅपटॉप (Windows/Linux/Mac) वेबकॅमेऱ्यासह, तसेच स्मार्टफोन. वेबब्राऊझर अद्ययावत असल्याची खात्री करा.
- इंटरनेट कनेक्शन आवश्यक (कमीत कमी 512 kbps) स्पीड असावा / 2G+ Network Connection)
- लॅपटॉप/मोबाईल पूर्ण चार्ज असल्याची खात्री करा.
  पेन/पेन्सील/कागद हे साहित्य जवळ बाळगा.

## प्रत्यक्ष ऑनलाईन परीक्षा कशी द्यायची ?

- ऑनलाईन परीक्षा देण्यासाठी https://nmu.unionline.in या लिंकवर क्लिक करावे. वेबब्राउझरमध्ये वेब कॅमेऱ्याला प्रवेश द्या.
- लिंकवर क्लिक केल्यानंतर User Name च्या ठिकाणी PRN No. टाकावा पासवर्ड साठी परीक्षार्थीने स्वत:ची जन्मतारीख टाकावी (ddmmyy या प्रमाणे) उदाहरणार्थ जर आपली जन्मतारीख 01/06/1990 असेल तर आपला पासवर्ड हा 010690 असा असेल
- Active Test वर क्लिक करून ड्रॉपडाऊन मेनू मधून Faculty व Programme Name निवडा.
- Course Code / Subject Name हे आपल्या वेळापत्रक व हॉलतिकीटाप्रमाणे निवडायचे असुन निवडल्यानंतर योग्य असल्याची खात्री करावी चुकलेले असल्यास लाल रंगाच्या x वर क्लिक करून पुन्हा योग्य विषय निवडावा. व त्यानंतर Login करावे
- ही प्रक्रिया झाल्यानंतर Face Authentication Process मधून आपणाला जावे लागेल. छायाचित्राची पडताळणी झाल्यानंतर आपली परीक्षा सुरु होईल.
- परीक्षा सुरु असतांना त्या खोलीत कोणताही आवाज अथवा इतर कोणाशी बोलण्याचा आवाज असता कामा नये. अन्य कोणी व्यक्ती शेजारी आढळल्यास सदर बाबीची नोंद घेऊन त्यानंतर कारवाई केली जाईल.

## परीक्षेच्या पायऱ्या कशा असणार आहेत ?

- विद्यार्थी Log in झाल्यानंतर परीक्षेच्या पेजवर प्रवेश मिळेल.
- पेजच्या वरील डाव्या कोपऱ्यात विद्यार्थ्याचे पूर्ण नाव दिसेल. आपले पूर्ण नाव तपासून घ्यावे व निवडलेला विषय बरोबर आहे का याची खात्री करून घ्यावी.
- परीक्षा देतांना उरलेला वेळ विद्यार्थ्याला स्क्रीनच्या वरील उजव्या कोपऱ्यात दिसत राहील. प्रश्नक्रमांक, प्रश्नांचे गुण, बुकमार्क हे सर्वात वरच्या ओळीत दिसेल.
- फिक्या राखाडी रंगात विद्यार्थ्याला प्रश्न दिसेल.
- उत्तराचे सर्व म्हणजेच चार पर्याय दिसतील. विद्यार्थ्याने योग्य पर्यायावर क्लिक करावे.
- उत्तर बदलायचे असेल तर बदलता येईल.
- परीक्षा सुरु असतांना हव्या त्या प्रश्नावर विद्यार्थ्याला जाता येईल.
- परीक्षेच्या पेजवर सर्वात खाली मध्यभागी असलेल्या First, Previous, Next, Last या बटणांचा वापर करून विद्यार्थी कोणत्याही प्रश्नावर जाऊ शकेल.
- पर्यायाच्या डावीकडील बटणावर क्लिक केल्यावर तो पर्याय निवडला जाईल. निवडलेला पर्याय Save झाल्याचे विद्यार्थ्याला पेजच्या सर्वात वरील भागात हिरव्या नोटीफिकेशन बार द्वारे सुचित केले जाईल.
- List of Questions या कोष्टकात विद्यार्थ्यास सर्व प्रश्न व त्यांच्या उत्तराचे विद्यार्थ्याने निवडलेले पर्याय दिसतील. प्रश्न बुकमार्क केलेले असतील तर तेही दिसतील. प्रश्नक्रमांकावर क्लिक केल्यास विद्यार्थ्याला त्या प्रश्नावर जाता येईल.
- विद्यार्थ्याला काही प्रश्नांची उत्तरे विचार करून नंतर द्यावेसे वाटल्यास बुकमार्क बटनाचा उपयोग करता येतो.
- निर्धारित वेळे आधी पेपर Submit करावयाचा असल्यास Submit बटन दाबावे. वेळ संपला असेल तर पेपर आपोआप Submit होईल.
- सगळया प्रश्नांची उत्तरे सोडविली असल्याची खात्री केल्यानंतरच Submit बटन क्लिक करा.
- एकदा Submit बटन क्लिक केल्यानंतर कोणताही बदल होऊ शकत नाही अथवा विद्यार्थी पुन्हा परीक्षा देऊ शकणार नाही.

## तांत्रिक व्यत्यय आल्यास काय करावे?

- तांत्रिक व्यत्ययाची भीती बाळगू नका, कारण विद्यार्थ्याला Window कालावधी तीन तासांचा दिला जाणार आहे.
- परीक्षा सुरु असतांना Disconnect झाले अथवा इतर तांत्रिक व्यत्यय आल्यास परत लॉगइन करता येईल.
- तांत्रिक व्यत्यय येण्याआधी जी उत्तरे सोडविली गेली असतील ती आपोआप Save होतील. त्यामुळे व्यत्यय दूर झाल्यावर Log in झाल्यानंतर परीक्षेचा उर्वरीत कालावधी आपोआप मिळेल.
- तांत्रिक व्यत्यय दूर होत नसेल तर Chatbot द्वारे अडचण मांडता येईल. त्यानंतर तात्काळ शंकेचे निरसन केले जाईल.
- यानंतरही तांत्रिक व्यत्यय दूर न झाल्यास विद्यार्थ्याने Trouble Logging in चा वापर करावा. त्यामध्ये विद्यार्थ्याने आपला PRN No. टाकावा त्यानंतर मोबाईल वर जो OTP प्राप्त होईल. तो OTP टाकल्यावर विद्यार्थी पुन्हा Log in होईल.
- Trouble Logging in चा पर्याय देखील यशस्वी होत नसेल तर संबंधित महाविद्यालयाच्या IT Coordinator यांच्याशी तात्काळ संपर्क साधावा. सर्व IT Coordinator ची यादी संकेतस्थळावर देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी ती यादी पाहून आपल्या महाविद्यालयाच्या IT Coordinator चा संपर्क क्रमांक परीक्षेपूर्वीच सोबत बाळगावा.

## परीक्षेसाठी वेळ व गुण किती असणार आहे ?

- प्रश्नपत्रिकेचे स्वरूप वस्तुनिष्ठ व बहूपर्यायी (Multiple Choice Questions) असेल.
- पदवीस्तरावरील ६० गुणांच्या परीक्षेसाठी ९० मिनीटे कालावधी व एकूण ६० प्रश्न असतील. यातील कमीत कमी ४० प्रश्न सोडवायचे आहेत.
- पद्व्युत्तर स्तरावरील ६० गुणांच्या परीक्षेसाठी दोन तास म्हणजे १२० मिनीटे कालावधी व एकूण ६० प्रश्न असतील. यातील कमीत कमी ४० प्रश्न सोडवायचे आहेत.
- सर्व प्रश्न सोडविले तरी जी ४० उत्तरे बरोबर असतील त्याचे ६० गुणांमध्ये रूपांतर केले जाईल.
- बहिस्थ अभ्यासक्रमात प्रविष्ठ विद्यार्थ्यांच्यां १०० गुणांच्या परीक्षेसाठी दोन तास म्हणजे १२० मिनीटे कालावधी व एकूण ५० प्रश्न असतील. व प्रत्येक प्रश्नाला २ गुण असतील विद्यार्थ्यांनी ५० पैकी कोणतेही ४० प्रश्न सोडवणे आवश्यक असुन विद्यार्थ्यांनी सर्व प्रश्न सोडविले तरी जी ४० उत्तरे बरोबर असतील त्याचे १०० गुणांमध्ये रुपांतर केले जाईल

## विद्यार्थ्यांसाठी अन्य सूचना

- स्मार्टफोनवर Online परीक्षा देत असाल तर परीक्षार्थींनी मोबाईलवर बाहेरून आलेले कोणतेही फोन स्वीकारू नये.
- परीक्षा सुरू करतांना इतर ॲप अथवा ब्राऊझर सर्च करण्याचा प्रयत्न करू नये. या हालचालींची नोंद सॉफ्टवेअर द्वारे केली जाणार आहे.
- ऑनलाईन परीक्षेसाठीच्या सूचना असलेली माहितीपुस्तिका (User Manual) विद्यापीठाच्या संकेतस्थळावर देण्यात आली आहे. या पुस्तिकेचे विद्यार्थ्यांनी अवलोकन करावे.
- काही तांत्रिक अडचण आल्यास गोंधळून अथवा घाबरून न जाता विद्यार्थ्याने संयम ठेवून वर सांगितल्याप्रमाणे तांत्रिक व्यत्यय दूर करण्यासाठीचे पर्याय निवडावे.
- संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या वेळापत्रकाप्रमाणे व प्रवेशपत्रावर (Hall Ticket) असलेल्या विषयांप्रमाणे विद्यार्थ्यांनी परीक्षा द्यावी.
- विद्यार्थ्यांची ज्या विषयांची संधी संपलेली आहे. अशा विषयांकरीता समकक्ष विषयांप्रमाणे परीक्षा द्यावी (जरी प्रवेश पत्रकात जुन्या विषयांची नोंद असली तरी)
- जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार कोणत्याही कारणास्तव विद्यार्थी परीक्षा देऊ न शकल्यास एक संधी म्हणून स्वतंत्र परीक्षांचे आयोजन केले जाईल.
- दिव्यांग विद्यार्थ्यांना नियमाप्रमाणे अतिरिक्त वेळ दिला जाईल.

## ऑफलाईन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सूचना

- ऑफलाईन होणाऱ्या परीक्षा या विद्यार्थ्यांनी निवडलेल्या परीक्षा केंद्रावर वेळापत्रकाप्रमाणे होतील.
- ऑफलाईन परीक्षा वस्तूनिष्ठ बहूपर्यायी (Multiple Choice Questions) असेल.
- या परीक्षेसाठी OMR Sheet दिले जाईल.
- OMR Sheet भरण्यासाठी काळ्या पेनचा वापर करावा.
- पदवीस्तरावरील ६० गुणांच्या परीक्षेसाठी ९० मिनीटे कालावधी व एकूण ६० प्रश्न असतील. यातील कमीत कमी ४० प्रश्न सोडवायचे आहेत.
- पद्व्युत्तर स्तरावरील ६० गुणांच्या परीक्षेसाठी दोन तास म्हणजे १२० मिनीटे कालावधी व एकूण ६० प्रश्न असतील. यातील कमीत कमी ४० प्रश्न सोडवायचे आहेत.
- सर्व प्रश्न सोडविले तरी जी ४० उत्तरे बरोबर असतील त्याचे ६० गुणांमध्ये रूपांतर केले जाईल.
- महाराष्ट्र शासन, विद्यापीठ अनुदान आयोग व आरोग्य मंत्रालय यांनी Covid-१९ बाबत दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार विद्यार्थ्यांची सुरक्षा व परीक्षेचे पावित्र्य राखून या परीक्षा होतील.


'A' Grade
NAAC Re-accredited
(3rd Cycle)

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
(0257) 2257100, 2258428 Fax-(0257) 2258407 ,2258406 , www.nmu.ac.in


